Literacy for a Billion

Movie: Mala Ek Chanas Hava
Year: 2012

Song: Nava Kora Bangla
Lyricist: Dr. Shrikant Narule

नवा कोरा बंगला
हाय माझा चांगला
लाल लाल काचंचा दरवाजा
नवा कोरा बंगला
हाय माझा चांगला
लाल लाल काचंचा दरवाजा
दार उघडून बघताय काय
तुम्ही न्हायाला येताय काय
दार उघडून बघताय काय
तुम्ही न्हायाला येताय काय

ए नाद तुझा लागला
जीव माझा रंगला
करतीस का तू गाजावाजा
भाडं तुझं मला सांगशील काय
दार उघडून दावशील काय
भाडं तुझं मला सांगशील काय
दार उघडून दावशील काय

हाय मऊमऊ सोफासेट
जरा बसू का आरामात
काय गरम थंडगार हवं
काय पायजे तुम्हा सांगावं

असं गालात हसताय काय
तुम्ही न्हायाला येताय काय
हे भाडं तुझं मला सांगशील काय
दार उघडून दावशील काय

नका हातानं स्वयपाक करू
प्याट अर्धवट नका हो भरू
तुम्ही बोलवा की येळोयेळी
मी लाटून देईल पोळी
चव चिकनची बघताय काय
तुम्ही न्हायाला येताय काय
भाडं तुझं मला सांगशील काय
दार उघडून दावशील काय

चला जाऊया टेरेसवर
कसं चांदण पडलय टपोरं
जणू चंद्राची तू कोर
मी प्रितीचा तुझ्या चकोर
लाली व्हटाची देशील काय
दार उघडून दावशील काय
दार उघडून बघताय काय
तुम्ही न्हायाला येताय काय

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*